5.Workshop on Liver Cleansing


# पारवेकर महाविद्यालयात क्लीन्जिंग थेरपी या विषयावरील वेबीनार संपन्न



स्थानिय : आबासाहेब पारवेकर महाविद्यालय,यवतमाळ द्वारे क्लीन्जिंग थेरपी या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.या वेबिनारला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.पियुष सक्सेना(सिनियर व्हाईस प्रेसिडेंट रिलायन्स इंडस्ट्रीज, मुंबई) हे लाभले होते.तर त्यांच्यासोबत प्रशोत्तराच्या माध्यमातून चर्चा घडून आणण्यासाठी प्राचार्य डॉ उदय नावलेकर उपस्थित होते. सद्य स्थितीत उद्भवलेल्या कोरोन महामारीच्या पार्श्वभूमीवर आरोग्या संबंधी जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयाची सामाजिक जबाबदारी म्हणून वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.वेबिनार मध्ये मार्गदर्शन करतांना डॉ. सक्सेना म्हणाले की,क्लीन्जिंग थेरपीच्या माध्यमातून आपण आपला इलाज आपण स्वत करू शकतो.आपल्या अनेक आजाराचे कारण हे आपल्या खानपानाच्या चुकीच्या सवई मुळे निर्माण झालेल्या असतात त्यामुळे आपल्या शरीरात ती लिव्हर,किडनी व पोटाच्या विविध भागात जमा होतात त्यामुळे आपली कार्यक्षमता कमी होते. ती अनावश्यक घाण बाहेर काढण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या क्लीन्जिंग थेरपी त्यांनी सांगितल्या.प्राचार्य डॉ.नावलेकर सरांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देताना त्यांनी लिव्हर क्लीन्जिंग,किडनी क्लीन्जिंग, ॲसीडीटी क्लीन्जिंग,जोईंट क्लीन्जिंग यासारख्या त्यांनी विकसित केलेल्या २८ प्रकारच्या क्लीन्जिंग थेरपी व त्याचे फायदे या संबंधीची सविस्तर माहिती दिली.या ऑनलाईन वेबिनारच्या माध्यमातून विविध देशभरातून झूम मीटिंग व फेसबुक लाईव्ह च्या माध्यमातून २०० पेक्षा जास्त लोक सहभागी झाले होते.या वेबिनारच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ.उदय नावलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.गजानन रहाटे ,प्रा.अदित्य नवग्रहे यांनी विशेष प्रयत्न केले.

Scanned by Scanner Go

# आबासाहेब पारवेकर महाविद्यालयात क्लीन्चिंग थेरपी या विषयावरील वेबीनार संपन्न



यवतमाळ दि. ४ (का.प्र.) आबासाहेब पारवेकर महाविद्यालय यवतमाळ द्वारे क्लीन्जिंग थेरपी या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. पियुष सक्सेना (सिनियर व्हाईस प्रेसिडेंट रिलायन्स इंडस्ट्रीज, मुंबई) हे लाभले होते. तर त्यांच्या सोबत प्रश्नोत्तराच्या माध्यमातून चर्चा घडून आणण्यासाठी प्राचार्य डॉ. उदय नावलेकर उपस्थित होते. सद्यस्थितीत उद्‌भवलेल्या कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य संबंधी जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयाची सामाजिक जबाबदारी म्हणून वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. वेबिनार मध्ये मार्गदर्शन करतांना डॉ. सक्सेना म्हणाले की, क्लीन्जिंग थेरपीच्या माध्यमातून आपण आपला इलाज आपण स्वत: करु शकतो. आपल्या अनेक आजाराचे कारण हे आपल्या खानपानाच्या चुकीच्या सवई मुळे निर्माण झालेल्या असतात त्यामुळे आपल्या शरीरात ती लिव्हर, किडनी व पोटाच्या विविध भागात जमा होतात त्यामुळे आपली कार्यक्षमता कमी होते. ती अनावश्यक घाण बाहेर काढण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या क्लीन्जिंग थेरपी त्यांनी सांगीतल्या. प्रचार्य डॉ. नावलेकर यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देतांना त्यांनी लिव्हर क्लीन्जिंग, किडनी क्लीन्जिंग, अॅडीसीडी क्लीन्जिंग, जोईंट क्लीन्जिंग यासारख्या त्यांनी कवसित केलेल्या २८ प्रकारच्या क्लीन्जिंग थेरपी व त्याचे फायदे या संबंधीची सविस्तर माहिती दिली. या ऑनलाईन वेबिनारच्या माध्यमातून विविध देशभरातून झूम मीटिंग व फेसबुक लाईव्ह च्या माध्यमातून २०० पेक्षा जास्त लोक सहभागी झाले होते. या वेबिनारच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. उदय नावलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गजानन रहाटे, प्रा. अदित्य नवग्रहे यांनी विशेष प्रयत्न केले.

Scanned by Scanner Go